| | |
|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय<br>रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे<br>फोन नं ०२२-२९४५१००१<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in |


**प्रेस नोट क्र. १५५** **दिनांक १२/०६/२०२१**

## जबरी चोरी, घरफोडी, वाहन चोरी करणा-या आरोपीतांना वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेकडुन अटक

वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरी, घरफोडी, वाहन चोरी सारख्या गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेऊन वरीष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळावरील बारकावे, तांत्रिक बाबी व गुप्त बातमीदार यांचे आधारे तपास केला आहे.

१) दिनांक ०७/०६/२०२१ रोजी सायंकाळी ०६.०० वा. चे सुमारास वसई फाटा, मुंबई-अहमदाबाद मुंबई हायवे रोड, वसई पुर्व येथे यातील फिर्यादी हे रिक्षात बसत असतांना अज्ञात आरोपीत यांनी फिर्यादीचे शर्टाचे वरील खिशातील विवो कंपणीचा मोबाईल हॅन्डसेट जबरदस्तीने हिसकावुन त्याचे साथीदार यांचेकडे मोबाईल देऊन सर्व आरोपी आरोपी जागेवरुन पळुन गेले होते. सदर घटनेबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने वालीव पोस्टे येथे गुरनं ा ५३६/२०२१ भादंविस कलम ३९२,३४ प्रमाणे दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील आरोपीत यांचा गुन्हे प्रकटिकरण शाखेने लागलीच गुप्त बातमीदारामार्फत शोध घेऊन रेकॉर्डवरील आरोपीत १) पवनकुमार जटाशंकर पांडे वय-२० वर्षे, रा.धानीव बाग, २) आषिश जटाशंकर पांडे वय- १९ वर्षे रा. धानीव बाग, नालासोपारा पु. ३) अमर कमलाप्रसाद जयस्वाल वय-२२ वर्षे रा.तुळींज, नालासोपारा ४) सौरभ राजबिर चौहान वय- १९ वर्षे रा. गालानगर, नालासोपारा पु. यांना अटक करुन गुन्हयातील गेला माल जप्त करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

२) दिनांक १२/०४/२०२१ रोजीचे रात्री ११.३० वा ते दि. १३/०४/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. चे दरम्यान यातील फिर्यादी यांनी युनायटेड टिंबर मार्ट, नवजिवन, वसई फाटा, वसई (पु.) येथे त्यांचे मालकीची महिंद्रा कंपनीची बोलेरो पिकअप क्रं- MH-४८/AY/४४७३ ही पार्क करून ठेवली असता सदरची बोलेरो पिकअप कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करून नेली होती. त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारारीवरून वालीव पोस्टे येथे गुरनं ा ५२०/२०२१ भा.दं.संहिता कलम ३७९ प्रमाणे दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीत याचा वालिव पोलीस स्टेशनचे गुन्हे प्रकटिकरण शाखेने लागलीच गुप्त बातमीदारामार्फत शोध घेऊन नामे श्रीराम उर्फ श्रवणकुमार उकाराम माली, वय- २१ वर्षे, रा.सातीवली, वसई यास अटक करुन त्याचेकडुन गुन्हयात चोरीस गेलेली बोलेरो पिकअप जप्त केली आहे.

३) फिर्यादी यांचे वाण्याचा पाडा, राजीवली, वसई पुर्व येथील घरी दि.०६/१०/२०२० रोजी अज्ञात आरोपीत याने घरफोडी करून १,४७,०००/-रुपये किं.चे सोन्याचांदीचे दागिने व रोख रक्कम चोरी केलेबाबतची फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने वालीव पोस्टे येथे गुरनं ा ८१०/२०२० भादंविस कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीचा गुन्हे शोध पथकाने गुप्त बातमीदाराचे मार्फतीने शोध घेऊन आरोपीत नामे आमीर मुक्तार बसे वय-२५ वर्षे रा- तळोजा, नवी मुंबई यास अटक करुन त्याचेकडुन गुन्हयातील चोरीस गेलेल्या सोन्याचे दागिने हस्तगत करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कामगिरी श्री.संजय पाटील, पोलीस उप आयुक्त, परि-२ वसई, श्री. अमोल मांडवे स.पो.आ., तुळीज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि. श्री. विलास चौगुले, वालीव पोलीस ठाणे, पोनि/ श्री.राहुलकुमार पाटील, (गुन्हे), सपोनि./ज्ञानेश फडतरे, पोउपनिरी/कदम, पोउपनिरी/नवले, पो.हवा./मनोज मोरे, मुकेश पवार, योगेश देशमुख, पो.ना./सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, विशाल निंबाळकर, अनिल सोनवणे, सतिष गांगुर्डे, पोअंम/विनेश कोकणी, बालाजी गायकवाड, गजानन गरीबे, सचिन बलीद यांनी केली आहे.